प्रश्न 3रा खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या. 7×1=7

1.मधूला कोणत्या भाज्या खाणे आवडायचे?(सुलभ)

2.मधूच्या स्वप्नात कोणत्या भाज्या त्याच्याशी बोलल्या?(सुलभ)

3. मधूला स्वप्नातून जाग आल्यानंतर त्याने काय केले?(साधारण)

4.आईने मधूसाठी जेवणात कोणते पदार्थ ठेवले होते?(सुलभ)

5. आईच्या चेहऱ्यावर हसू का आले?(कठिण)

6. विशेषण म्हणजे काय?(साधारण)

7. क्रियापद म्हणजे काय?(साधारण)

प्रश्न 4 था जोड्या जुळवा. (सुलभ). 5×1=5

अ.	ब
1. मेथी, पालक.	1. कोशिंबिरीच्या भाज्या
2. बटाटा, नवलकोल, भात, गहू.	2 .स्निग्ध पदार्थ
3.गाजर	3.हिमोग्लोबीनखनिजे ,
4.दूधतूप ,.	4. पिष्टमय पदार्थ
5.मूळा ,काकडी ,टोमॅटो.	5. जीवनसत्वे

प्रश्न 5 वा खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिही. (कठिण) 2×3=6

1. स्वप्नात आलेल्या पाले भाज्याने मधुला कोणता सल्ला दिला?

2. समतोल आहार म्हणजे काय?

घटक -14

आता उठवू सारे रान

नील नकाशा: उद्दिष्टानुसार गुणांची विभागणी

उ उद्दिष्टे	शेकडावारगुण	गुण	प्रश्न
ज्ञान	33.33%	10	10
आकलन	40%	12	12
अभिव्यक्ती	13.33%	4	2
कौशल्य	13.33%	4	1
एकूण	100%	30	25

काठिण्य पातळीनुसार गुणाचीविभागणी

काठिण्य स्तर	शेकडा वारगुण	गुण	प्रश्न
सुलभ	50%	15	15
साधारण	36.66%	11	9
कठिण	13.33%	4	1
एकूण	100%	30	25

- अध्ययननिष्पत्ती –

- *देशप्रेम व देशाभिमान वाढीस लागणे.
- *विद्यार्थ्याला एकतेचे महत्त्व समजते.
- *आवाजातील चढ-उतारासह कविता चालीत म्हणतो.

प्रश्न क्र.1 अ) योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.(सुलभ) 1*6=6

१).स्वातंत्र्य दिन या दिवशी साजरा करतात.

अ) 5 सप्टेंबर ब) 15 ऑगस्ट क) 26 जानेवारी

२).तिरंगी झेंड्या मध्ये अनुक्रमे हे रंग आहेत.

अ)पांढरा हिरवा केशरी ब) लाल पिवळा निळा क) केशरी पांढरा हिरवा

३).भारतातील मुख्य व्यवसाय हा आहे.

अ)मच्छीमारी ब) शेती क) नोकरी

४). शेतीचे काम करणाऱ्याला….. म्हणतात.

अ) शेतकरी ब) शेतमालक क) सुतार

५). या कवितेत….. . पेटविणार आहेत.

अ) मशाल ब) दिवा क) रान

६) या कवितेत याला फार महत्व दिलेले आहे.

अ).रानाला ब) प्राणाला क) एकजुटीला

प्रश्न क्र.2 आ) समानार्थी शब्दांच्या जोड्या लावा. (सुलभ). 1*5=5

७) प्राण - ध्वज

८) किसान - सैन्य

९) मशाल - जीव

१०) झेंडा - शेतकरी

११) फौज - हिलाल

प्रश्न क्र.3 इ) खालील वाकप्रचारांच्या अर्थासोबत जोड्या लावा.(साधारण) 1*4=4

१२) ठाण मांडणे - खूप कष्ट करणे

१३) प्राण पणाला लावणे. - निश्चय करणे

१४) कंबर कसणे. - शक्य ते सर्व करणे

१५) रान पेटविणे - निर्धार करणे

प्रश्न क्र.4 ई) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. (सुलभ) 1*4=4

१६) हसणे ×

१७) स्वातंत्र्य ×

१८) पेटविणे. ×

१९) न्याय ×

प्रश्न क्र.5 उ) एका वाक्यात उत्तरे लिहा? (साधारण) 1*3=3

२०) साने गुरुजींचे पूर्ण नाव लिहा?

२१) किसान व बेडी हा कोणत्या भाषेतील शब्द आहे?२२) दाणादाण कोणाची उडणार आहे?

प्रश्न क्र.6 ऊ) दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा? (कठीण) 2*2=4

२३) शेतकऱ्यांच्या राज्यासाठी काय घेऊन काय करायचे आहे?

२४) स्वातंत्र्याचे गान शेतकरी कसे गाणार आहेत ?

प्रश्न क्र.7 ए) खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा? (कठीण) 1*4=4

शेतकऱ्यांची फौजनिघे...........

.... कामकरी मांडणार हो ठाण.

पाठ 15

एफ एम रेडिओ

- *नील नकाशा*
- उद्दिष्टानुसार गुणांची विभागणी

उद्दिष्ट	शेकडावार गुण	प्रश्न	गुण	
ज्ञान	50%	12	12	
आकलन	20%	5	5	
अभिव्यक्ती	20%	6	12	
प्रशंसा	10%	2	6	

कठीण पातळीवरील गुण विभागणी

प्रश्न प्रकार	शेकडा	प्रश्न	गुण
सुलभ	65%	17	17
साधारण	25%	6	12
कठीण	10%	2	6
एकूण	100%	25	35

- *अध्ययन निष्पत्ती*

*इंग्रजी शब्दांचे उच्चार करता येतात.

*इलेक्ट्रिकल वस्तूंची ओळख होते.

*प्रश्नचिन्ह उद्गारवाचक कोणी कोणाला म्हटले या पाठातील संवाद समजतात.

*संपर्क साधनांची ओळख होते.

*नवीन अर्थाचे शब्द समजावून सांगता येतात.

प्रश्न 1] योग्य पर्याय निवडा (1*5)

1] राधिका व शुभम कोणाच्या गावी गेले होते?(सुलभ)

(मामाच्या, मावशीच्या, मित्राच्या)

2] शुभमच्या मामाने कोणती वस्तू आणली होती? (सुलभ)

(बॅटरी, फोन, रेडिओ)

3] राधिका व शुभम कोणत्या सुट्टीत मामाच्या गावी गेले होते? (सुलभ)

(दिवाळी सुट्टी, दसरा सुट्टी, क्रिसमस सुट्टी)

4] राधिकाने कोणते गाणे प्रसारित करण्यास सांगितले होते? (सुलभ)

(चिऊताई चिऊताई, चॉकलेटचा बंगला, सांग सांग भोलानाथ)

5] मुलांना शाळेभोवती तळे साचून काय हवे होते? (सुलभ)

(सुट्टी, पाणी, होड्या सोडणे)

प्रश्न 2] रिकाम्या जागा भरा (1*5)

1. ऐकण्याची क्रिया ________ इंद्रिया मार्फत होते. (सुलभ)
2. इलेक्ट्रिक वस्तू _____________हाताळावे. (सुलभ)
3. शैक्षणिक शाळेची सुरुवात__________महिन्यात होते. (सुलभ)
4. जागतिक रेडिओ दिन _________दिवशी साजरा करतात. (साधारण)

5. भारतात एफएम रेडिओची सुरुवात_______साली झाली.(साधारण)

प्रश्न3] मराठी शब्दाचा इंग्रजी शब्दांमध्ये अनुवाद करणे (साधारण) (1*7)

मराठी शब्दइंग्रजी अनुवाद

1. दूरध्वनी

2. कॅम्पुटर

3. चॅनल

4. रेडिओ

5. दूरध्वनी

6. पंखा

7. शीतकपाट

प्रश्न4] समानार्थी शब्द लिहा(साधारण) (1*4)

1. सत्र -

2. प्रसिद्ध -

3. शांतपणे -

4. उपलब्ध -

प्रश्न5] खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा (2*9)

1]. वक्ता कुणाला म्हणतात?(साधारण)

2]. शुभमने मामाला कोणता प्रश्न विचारला?(साधारण)

3]. फ्रिक्वेन्सी म्हणजे काय?(साधारण)

4]. रेडिओवरकोणत्या प्रकारची माहिती मिळते?(साधारण)

5]. ऑल इंडिया रेडिओ नावाची दोन केंद्रे कोठे सुरू झाली?(साधारण)

6].एफएम म्हणजे काय?(साधारण)

7]. एफएम चा शोध कोणी लावला?(साधारण)

8]. रेडिओ लहरीच्या प्रक्षेपणासाठी कोणत्या वारंवार ते चा वापर करतात?(साधारण)

9]. क्रियाविशेषण म्हणजे काय? (साधारण)

प्रश्न 6] . खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा (3*8)

1..कोणत्याही चार करमणुकीच्या साधनांची नावे लिहा? (कठीण)

2..एफएम चा आवाज सुस्पष्ट कसा ऐकू येतो ? (कठीण)

3..नवीन चॅनल सुरू करण्यासाठी काय करावे लागते? (कठीण)

4..एफएम मधून कोणती माहिती मिळते? (कठीण)

5.तुमच्या घरातील इलेक्ट्रिकल वस्तूंची नावे लिहा? (कठीण)

1. तुम्हाला माहीत असणाऱ्या पाच चैनल ची नावे लिहा? (कठीण)
2. देशामध्ये पहिल्यांदा आकाशवाणी केंद्र कोठे व केव्हा सुरू झाले? (कठीण)

3. *8]खालील चित्रे ओळखून नावे लिहा(कठीण)*



1

2

3

4

5

घटक - 16

चतुर मैत्रीण

- **अध्ययन निष्पत्ती –**

* ऐकलेल्या किंवा वाचलेल्या प्रसंग अथवा गोष्टीवर आधारित विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देता येणे.

* वाक्यातील शब्दांच्या जाती ओळखता येणे.

*आवाजातील चढ-उतारासह दिलेली गोष्ट अथवा प्रसंग स्वतःच्या शब्दात व्यक्त करता येणे.

- **नील नकाशा**
- **उद्दिष्टानुसार गुणांचे विभागणी**

उद्दिष्टे	शेकडा गुण	गुण संख्या	प्रश्न संख्या
ज्ञान	74%	16	13
आकलन	12%	4	2
अभिव्यक्ती	19%	7	3
प्रशंसा	25%	9	6
एकूण	100%	36	24

- **काठीण्यता पातळीनुसार गुणांची विभागणी**

प्रश्नाचे स्वरूप	शेकडा प्रश्न	प्रश्न संख्या	गुण
सुलभ	42%	10	10
साधारण	45%	11	16
कठीण	13%	3	10
एकूण	100%	24	36

प्रश्नक्र. अ) अचूक पर्याय निवडून उत्तरे लिहा.

1*6=6

१)भटजी अतिथींच्या मागे.........द्यायला धावले. (सुलभ)

अ)पाणी ब) मुसळ क) जेवण

२)नदी गावापासून सुमारे..... अंतरावर होती. सुलभ,

अ)एकमैल ब) दोनमैल क) तीनमैल

३)शाब्बास! तू खरंच चांगली मुलगी आहेस. यावाक्यातील लाल रंगाच्या शब्दाची जात ओळखा. (साधारण)

अ)नाम ब) सर्वनाम क) केवलप्रयोगीअव्यय

४)घामफुटणे ‘ या वाक्य प्रचाराचा अर्थ.....(साधारण)

अ)कष्टकरणे ब) भीतीवाटणे क) गरमहोणे

५) नदीच्या काठावर..... देऊळ होते.

अ) सुंदर ब) मोठे क) छोटे(सुलभ)

६) भटजींची पत्नी दिवसेंदिवस......होऊ लागली. (सुलभ)

अ) सशक्त ब) दुर्बल क) अशक्त

प्रश्नक्र. आ) समानार्थी शब्दांच्या जोड्या लावा. (सुलभ). 1*6=6

७) पती - पाहुणा

८) पाणी - सखी

९) फुल - नवरा

१०) नदी - जल

११) मैत्रीण - सुमन

१२) अतिथी. - सरिता

प्रश्नक्र. क) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.(साधारण) 2*5=10

१३) भटजींना कोणती सवय होती?

१४) गावातील लोक कसे राहत असत?

१५) भटजींच्या पत्नीला उपाशी का राहावे लागे?

१६) भटजींच्या पत्नीने कशाची पूजा केली?

१७) भटजींच्या पत्नीने भटजींना कोणते काम सांगितले?

प्रश्नक्र. ड) खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा. (कठीण) 3*2=6

१८) भटजींची पत्नी अशक्त का होऊ लागली?

१९) मैत्रिणीने भटजींच्या पत्नीला कोणता सल्ला दिला असेल?

प्रश्नक्र. इ) खालील वाक्यातील लाल रंगातील शब्दांची जात ओळखा.(सुलभ) 1*4=4

२०) टेबलाखाली चेंडू आहे.

२१) बाळ खुदकन हसले.

२२) आई आणि आजी देवळात गेल्या आहेत.

२३) अबब! किती उंच इमारतही!

प्रश्नक्र. ई) दिलेल्या शब्दांवरून गोष्ट रचा.(कठीण). 1*4=4

२४) (एक टोपी विक्रेता, झाडाखाली विश्रांती, माकडे टोप्या उचलतात, युक्ती सुचते, स्वतःची टोपी काढून फेकतो, माकडेपण फेकतात.)

पाठ -17

देवतूल्य आईबाबा

- (अध्ययन निष्पत्ती):

1. पालकां विषयी कृतज्ञता: विद्यार्थ्यांना आई-वडिलांप्रती आदर, प्रेम व कृतज्ञता व्यक्त करणे शिकते.

2. मूल्यशिक्षण: सत्य, प्रेम, नम्रता, आणि शुद्धभाव या सारख्या जीवन मूल्यांचे महत्त्व समजते.

3. चांगली वागणूक व आदर्श व्यवहार: पालकांचे आशीर्वाद घेणे, त्यांचे पावनत्व ओळखणे व त्यांच्या पायांवर वाकून नम्रता दाखवणे या गोष्टी आत्मसात करता येतात.

4. सकारात्मक भावनिक विकास:मुलांच्या मनात आईवडिलां विषयी आपुलकी आणि भक्तिभाव निर्माण होतो.

5. कविता समजून घेणे व रसग्रहण:विद्यार्थ्यां नाकविता समजून घेता येते

6. भाषिक कौशल्ये विकसित होणे:नवीनशब्द संपदा, शब्दार्थ, आणि रचना यांबाबत ज्ञान वाढते.

7. मानवीसंबंधांतीलआदर्श: आई-वडील हेच खरे देव असल्याचे भान निर्माण होते.

काठिण्य पातळी नुसार गुणाची विभागणी

सुलभ- २१ प्रश्न

साधारण –१० प्रश्न

कठीण- ४ प्रश्न

एकूण- ३५ प्रश्न

I. योग्य पर्याय निवडा (सुलभ)

१. देवतुल्यआई बाबा कवितेचे कवी कोण?

ए) कुसुमाग्रज

ब) पु ल देशपांडे

सी) उमाकांत काणेकर

डी) केशवसुत

२) देवतुल्य कोण आहेत?(सुलभ)

a. आई बाबा

b. मामा मामी

सी. काका काकू

ड दादा वहिनी

३)कवितेचे शीर्षक काय आहे?(सुलभ)

a देवतुल्य आई बाबा

बी नाच रे मोरा

सी नव्या युगाचे गाणे

डी मधमाशी

४) कवी माथी काय लावून पावन होतो?(सुलभ)

ए चरण धूळ

बी गुलाल

सी कुंकू

ड पाणी

५) आई बाबा नित्यनेमाने कोणते वचन बोलत असतात?(सुलभ)

ए सत्याचे

बी खोट्याचे

सी फसवण्याचे

ड लबाडीचे

६)कवी रोज कोणाची पूजा करतो?(सुलभ)

ए आई बाबांची

बी मित्रांची

सी पैशांची

डी प्राण्याची

७) कवी डोकीवर कोणाचा वरद हस्त मागत आहेत(सुलभ)

ए शेजाऱ्यांचा

बी मित्राचा

सी शत्रूंचा

ड आई बाबांचा

८) दोन नेत्र ज्योती म्हणजे काय?(सुलभ)

ए डोळे

बी कान

सी पाय

ड हात

९) सतत सत्य बोलावे हे कोण शिकवतात ?(सुलभ)

ए प्राणी

बी आई बाबा

सी पाहुणे

ड शत्रू

१०) सत्त्वशील या शब्दाचा अर्थ काय ?(कठीण)

ए सात्विक

ब नास्तिक

सी सतत

ड सहनशील

११) या कवितेत कोणता भाव व्यक्त झाला आहे ? (कठीण)

A क्रोध

बी दुःख

सी भक्तिभाव

ड आश्चर्य

१२) वचन सत्य बोलायचं म्हणजे काय?(सुलभ)

A खोट बोलणे

बी न बोलणे

C l सतत खोड्या काढणे

ड नेहमी खर बोलणे

१३) कवितेचा मुख्य विषय काय आहे ?(कठीण)

ए निसर्ग

बी शाळा

सी आई वडिलांवरील प्रेम व कृतज्ञता

ड देशप्रेम

१४) आई बाबना कोणत्या गोष्टीचा खेद खंत नाही?(कठीण)

ए भल्या बुऱ्या परिणामांचा

बी मुलांच्या वावगेपणाचा

सी समाजाचा

ड पर्यावरणचा

१५) आई बाबांची माया कोणाहून मोठी आहे ? (सुलभ)

ए नभाहून

बी पाण्याहून

सी पैशांहून

द गाडीहून

|| समानार्थी शब्द लिहा (साधारण)

१ सागर

२ नभ

३ डोळे

४ बाप

५ आई

||| लयबद्ध शब्द लिहा (सुलभ)

१ आई

२ नेत्रज्योती

३ प्रेम

४ सागराचे

५ नाही

III. जोड्या जुळवा (साधारण)

A (कडव्यातील शब्द) B (त्याचा अर्थ)

1. नेत्रज्योती a) डोळे

2. चरणधूळ b) पायावरघाललेलीमाती

3. वरदहस्त c) आशीर्वाददेणाराहात

4. नम्रता d) सौम्यवागणूक

5. सत्यशीलता e) खरेबोलण्याचागुण

पाठ 18

दिनूचे बिल

- नील नकाशा

- उद्दिष्टानुसार गुणांची विभागणी

अध्ययन उद्दिष्टे	शेकडा	गुण	प्रश्न संख्या
ज्ञान	50	25	25
आकलन	26	13	13
अभिव्यक्ती	12	6	3
प्रशंसा	12	6	2
एकूण	100%	50	43

- काठीण्यता पातळीनुसार गुण विभागणी

प्रश्न प्रकार	शेकडा	अंक	प्रश्न संख्या
सुलभ	58	25	25
साधारण	30	13	13
कठीण	12	12	5
एकूण	100%	50	43

- अध्ययन निष्पत्ती :

1) व्यवहारातील शब्दांची ओळख

विद्यार्थ्यांना बिल, डॉक्टर ,औषध, तपासणी, इंजेक्शन यासारख्या दैनंदिन व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या शब्दांचीओळख करून घेतो.

2) संवादाचेआकलन दिनू आणि त्याचे आई-वडील यांच्या संवादातून बिल यासंकल्पनेचे स्पष्टीकरण विद्यार्थ्यांना समजेल.

3) जिज्ञासू वृत्तीचा विकास बिल म्हणजे काय असा प्रश्न दिनोने विचारल्याने विद्यार्थ्यांमध्ये देखील बिलयाविषयी जिज्ञासा निर्माण होईल.

4) भाषेच्यासर्वकौशल्याचाविकासहोतो.

I.योग्य पर्याय निवडून खालील प्रश्न सोडवा

1) दिनूचे वडील............................ होते. (सुलभ)

अ) वकील आ) पोलीस इ) डॉक्टर ई)दुकानदार

2) दिनूव डिलांबरोबर...................... येथे गेला होता. (सुलभ)

अ)बाजारात आ)शहरात इ)शाळेत ई)दवाखान्यात

3) दवाखान्याला.................... लोक येत होते. (सुलभ)

अ) पुष्कळ आ)दोन इ)पाच ई)सात

4) दवाखान्यामध्ये लोक ....आणण्यासाठी येत असत. (सुलभ)

अ) दूध आ)औषध इ)फळे ई)केळी

5) डॉक्टर पेशंटना तपासून............ व............. देत असत. (सुलभ)

अ) चॉकलेटवगोळया आ)दूधवदही इ)औषध व इंजेक्शन ई)ब्रशवकोलगेट

6) तपासल्यानंतर पेशंट डॉक्टरना.............. किती झाले असे विचारीत. (सुलभ)

अ) पैसे आ) रुपये. इ) बिल ई) रक्कम

7) दिनू एका लहान ....बसून सारे पहात असे. (सुलभ)

अ) टेबलावर आ) खिडकीवर इ) जमिनीवर ई) खुर्चीवर

8) दवाखान्यातल्या................... शागोष्टी त्याला आता कळू लागल्या होत्या. (सुलभ)

अ) दोनगोष्टी आ) पाचगोष्टी इ) बऱ्याच ई) सातगोष्टी

9) दिनूला ....म्हणजे काय तेअ जून कळले नव्हते. (सुलभ)

अ) पावती आ) औषध इ) इंजेक्शन ई) बिल

10) टेबलावरचा एक................. घेतलाआणि दिनूला दाखवला. (सुलभ)

अ) पेन आ) वही इ) कागद ई) चिठ्ठी

II.जोड्या जुळवा (सुलभ)

अ.	ब
11. रोग्याला तपासल्याबद्दल - 100 रुपये	50 रुपये
12. एक्स-रेकाढल्याबद्दल - 80 रुपये	150 रुपय
13. रक्तत पासल्याबद्दल - 50 रुपये	100 रुपये
14. औषध दिल्याबद्दल - 200 रुपये.	80 रुपये
15. इंजेक्शन दिल्याबद्दल - 150 रुपये	200 रुपये

III.एका वाक्यात उत्तरे लिहा (सुलभ)

16. कोणाचे वडील डॉक्टर होते?

17. वडिलां बरोबर दिनू कोठे जात असे?

18. दिनूच्या डोळ्यात काय आले?

19. दिनूचा एकदम काय भरून आला?

20. दिनूच्या हातातला काय गळून पडला?

21. दिनू आईकडे काय घेऊन धावत गेला?

22. दिनू काही न बोलता आईला काय परत दिले?

23. दिनू आईच्या मांडीवर डोके ठेवून काय करू लागला?

24. आईने दिनूला कुशीत घेऊन काय केले?

25. आईने दिनूच्या गालाचे काय घेतले?

IV. समानार्थी शब्द लिहा (साधारण)

26. आई

27. पृथ्वी.

28. सूर्य

29. चंद्र

30. सुमन

V.विरुद्धार्थी शब्द लिहा (साधारण)

31. आई.

32. सुख

33. चांगले

34. गरीब

VI.वचन बदला (साधारण)

35. खिडकी.

36. फुल

37. घर.

38. शाळा

VII.खालील प्रश्नांची तीन-चार वाक्यात उत्तरे लिहा ? (कठीण)

39. दिनूच्या वडिलांकडे लोक कशासाठी येत असत?

40. आईचे बिल पाहून दिनूची अवस्था कशी झाली?

41. आईने दिनूला कोणता बोध सांगितला?

42. दुकानदाराकडून साहित्य आणलेल्या वस्तूंचे बिल तयार करा?

43. बिलघेतल्यानंतर कोणकोणत्या गोष्टी आपण काळजीपूर्वक पाहिल्या पाहिजेत?

पाठ -19

तेनाली रामाचे चातुर्य

❖ अध्ययन निष्पत्ती

- 1.शब्द,वाक्य व घटना क्रमवार सांगता येणे.

  2.परिचित प्रसंग व घटना यांचे वर्णनआपल्या शब्दात करता येणे.

  3.एखाद्या घटने मागील सत्यतेची पडताळणी करतायेणे.

  4. चित्र पाहून चित्राचे वर्णन करता येणे.

  5. पाठाचा सारांश स्वतःच्या शब्दात सांगता येणे.

  6. पूर्णविराम, स्वल्पविराम,अवतरणचिन्ह,प्रश्नचिन्ह, उदगारवाचक चिन्हयांची ओळख करून घेणे.

❖ नीलनकाशा

- कठीणतेवर आधारित

प्रश्नप्रकार	शेकडा	एकूणगुण 25 असताना	एकूणगुण 30 असताना
सुलभ	65%	16	18
साधारण	25%	6	8
कठीण	10%	3	4
एकूण	100%	25	30

- गुणाधारीत

गुण	प्रश्नसंख्या	एकूणगुण 25 असताना	एकूणगुण 30 असताना
1	10	1x 1 0= 10	1 x 10 = 10
2	3	2 x 3 = 6	2 x 4 = 8
3	2	3 x 2 = 6	2 x 4 = 8
3	1	3 x 1 = 3	4 x 1 = 4
एकूण		25	30

- अध्ययन निष्पत्ती –

*शब्द, वाक्यव घटना क्रमवार सांगतात.

*परिचित प्रसंग व घटना स्वतःच्या शब्दात व्यक्त करतात.

* प्रत्येकघ टनेमागील सत्याची पडताळणी करण्यास शिकतात

❖ प्रश्न- 1 कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.(सुलभ). - प्रत्येकी 1 गुण

(तेनालीराम, पाचशे, कृष्णदेवराय,चतुर्या, बर्फाचा, न्याय, पाऊस, कोषागारात, शिक्षा)

1. ....हा चाणाक्ष सल्लागार होता. (सुलभ)

2. ....च्या राज्यात भीषण दुष्काळ पडला.(सुलभ)

3. बियाणे आणण्यासाठी........मोहरा द्यायचे ठरले. (सुलभ)

4. प्रत्येकाने........चा तुकडा हातात घ्यावा व पुढच्यास द्यावा. (सुलभ)

5. दुसऱ्याच वर्षी निसर्गाच्या कृपेनें....... चांगला झाला. (सुलभ)

6. ....रक्कम पुन्हा जमा होऊ लागली. (सुलभ)

7. चौकशी न करता.......फर्मावणे हा........ नव्हे. (सुलभ)

8. तेनाली रामाच्या.........वर कृष्णदेवराय प्रसन्न झाले. (सुलभ)

❖ प्रश्न- 2 शब्दांचा योग्य क्रम जुळवूनअर्थ पूर्ण शब्द तयार करा. - प्रत्येकी1गुण

9. जीनरखदा- (साधारण)

10. गाषाकोर- (साधारण)

11. तुर्यचा - (साधारण)

12. बाररद- (साधारण)

13. हारामज- (साधारण)

14. नादसवभा- (साधारण)

15. कृवरादेष्णय- साधारण)

❖ प्रश्न -3 समानार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा. (सुलभ) - प्रत्येकी1 गुण

16. पाणी	आकाश। (सुलभ)
17.नदी	सदभावना(सुलभ)
18.पाऊस	जल(सुलभ)
19.गगन	वर्षा (सुलभ)
20.चांगलीवृत्ती	सरीता(सुलभ)

❖ प्रश्न – 4 खालील व्यक्तींचा त्यांच्या हुद्द्यानुसार क्रम लावा. (साधारण) -प्रत्येकी1गुण

21. मंत्री (साधारण)

22. सरदार (साधारण)

23. शेतकरी (साधारण)

24. राजा (साधारण)

25. सेनापती (साधारण)

26. सुभेदार(साधारण)

27. सैनिक (साधारण)

❖ प्रश्न – 5 योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (सुलभ) -प्रत्येकी1गुण

28. 'कोषागार'या शब्दाचा अर्थ- (सुलभ)

अ) सल्लागार ब) खजिना क) शस्त्रभांडार

29. तरबेजम्हणजे- (सुलभ)

अ) मूर्ख ब) तलवारबाज क) कुशल

30. अजिबात पाऊस न पडणे म्हणजे- (सुलभ)

अ). दुष्काळ ब).सुकाळ क). अतिवृष्टी

31. वेष बदलून फिरणे म्हणजे- (सुलभ)

अ). भाषांतर ब). वेषांतर क). भटकंती

32. शेतकऱ्यानी तेनाली रामाचा........केला.   (सुलभ)

अ). जयजयकार   ब). अपमान   क). धिक्कार

❖ प्रश्न – 6 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (सुलभ) - प्रत्येकी1गुण

33. तेनालीराम हाकोणाच्या दरबारात सल्लागार म्हणून होता? (सुलभ)

34.शेती का पिकली नाही? (सुलभ)

35.राजाने शेतकऱ्यांना पाचशे मोहरा कशासाठी दिल्या?(साधारण)

36.तेनालीराम वेषांतर करून कोठे हिंडत होता? (सुलभ)

37.न्याय कोणाला मिळाला होता? (सुलभ)

38. कृष्णदेवराय कोणावर प्रसन्न झाले? (सुलभ)

39. शेती का पिकली नाही? (साधारण)

40. प्रत्यक्षात शेतकऱ्यांना किती मोहरा देण्यात आल्या होत्या? (साधारण)

❖ प्रश्न – 7 खालील वाक्ये कोणी कोणाला म्हटले ते ओळखा? - प्रत्येकी2गुण

41."महाराज चौकशी न करता शिक्षा फर्मावणे हा न्याय नव्हे."(सुलभ)

42. "कसली काळजीक रताय? काय झाल?"(सुलभ)

43. "अग राजाकडून कर्ज घेतलंय ते परत करायचंय."(सुलभ)

44. "रामन! झाली कातुझी चौकशी?" (सुलभ)

❖ प्रश्न – 8 खालील प्रश्नांची दोन वाक्यात उत्तरे लिहा. – प्रत्येकी 2 गुण (साधारण)

45.दुष्काळपडल्यामुळेकायकायघडले? (साधारण)

46. शेतकऱ्यांनाकशाचेखूपसमाधानझाले? (साधारण)

47.बर्फाचातुकडालहानकसाझाला? (साधारण)

48.शेतकऱ्यांनीतेनालीरामचाजयजयकारकेव्हाकेला? (साधारण)

❖ प्रश्न – 9 खालील वाक्ये घडलेल्या घटनेनुसार क्रमावर लिहा.   (कठीण) 4 गुण

49. अ. निरापराध शेतकऱ्यांना न्याय मिळाला होता.

आ.शेतकऱ्यांचे खूप समाधान झाले.

इ. राजाने शेतकऱ्यांना बियाणे आणण्यासाठी पाचशे मोहरा दिल्या.

ई. राज्यात भीषण दुष्काळ पडला होता.

उ. तेनाली रामच्या चातुर्यावर कृष्णदेवराय प्रसन्न झाले.

ऊ. बर्फाचा तुकडा दरबारातील प्रत्येकाने हातात घ्यावा व पुढच्यास द्यावा.

50.खालील चित्रात काय घडत आहे? तुमच्या शब्दात थोडक्यात लिहा. (कठीण)4 गुण

51. या पाठाचा सारांश थोडक्यात तुमच्या शब्दात लिहा. (कठीण) 4गुण

.

पाठ -20

ज्योत

- **अध्ययन निष्पत्ती -**

* दिव्याची ज्योत कोणता संदेश देते हेसमजून घेतात.

* पूर्वीपासून ते आतापर्यंत प्रकाश दीपांच्या साधनांमध्ये कसा बदल होतगेला हेसमजून घेतात.

*ज्योतीचा आपण कोणता गुण घ्यावा या बद्दल समजून घेतात.

*कविता तालासुरात गातात.

*नवीन शब्दांचे अर्थ समजतात.

*लयबद्ध शब्दांची ओळख होते.

*समानार्थी व विरुद्धार्थी शब्द त्यातील फरकस मजतो.

*अनुलेखन करणे समजते.

- **नील नकाशा**
- **उद्दिष्टानुसार गुणांची विभागणी**

अध्ययन उद्दिष्टे	शेकडा गुण	गुण	प्रश्न
ज्ञान	33.33%	10	10
आकलन	40%	12	12
अभिव्यक्ती	13.33%	4	2
प्रशंशा	13.33%	4	1
एकूण	100%	30	25

- कठीण्य पातळीनुसार गुणाची विभागणी

काठीण्यस्तर	शेकडावर गुण	गुण	
सुलभ	65%	20	
साधारण	25%	7	
कठीण	10%	3	
एकूण	100%	30	

1 योग्य पर्याय निवडा. (प्रत्येकी 1 गुण)

1. शेतकऱ्याची आवडती कोण होती? (सुलभ)

A)पणती B)समई C)दिवटी D) कंदील

2. काळासा धूर कोण सोडते? (साधारण)

A)समई B) कंदील C) बत्ती D)बिजली

3. बिजली म्हणजे ? (साधारण)

A)प्रकाश B)दिवटी C)वीज D)दिवा

4.घरे मंदिरे कुणामुळे लखलखतआहेत? (साधारण)

A)पणती B)समई C) बत्ती D)बिजली

5.ज्योती सर्वांना काय देते? (सुलभ)

A) अंधार B)प्रकाश C)सूर्य D)पाणी

6. कंदील म्हणजे - (साधारण)

A)दिवा B)वात C)आकाशदिवा D) झुंबर

7. दिवटी अशी तयार करतात- (साधारण)

A)मेणबत्तीपासून B)काठीलाचिंध्याबांधून C)कागदापासून D)लाकडापासून

8. पणती यापासून बनवतात.- (सुलभ)

A)कागद B)लाकूड C)माती D)कापड

9. परि या शब्दाचा अर्थ आहे- (साधारण)

A)परंतु B)आणि C)परी D)म्हणून

10. पणतीमध्ये ......घातल्याने पेटते.(सुलभ)

A)पाणी B)रॉकेल C)शाई D)तेल

2 .नवीन शब्दाचे अर्थ लिहा. (सुलभ). (प्रत्येकी 1 गुण)

1.दिवटी -

2.झगमगाट -

3.बिजली-

4.लखलख-

5. मिणमिणते -

6. उजळो -

7. इवली -

8. ठावे -

9. सकल -

10. बरवे -

3.समानार्थी शब्द लिहा. (साधारण). (प्रत्येकी 1 गुण)

1. जन=

2.लहान=

3.देह=

4. मज=

5.सर्व=

6. नवीन=

7. घर =

8. मंदिर =

9. बरवे =

10. ज्योत =

4. विरुद्धार्थी शब्द लिहा. (साधारण). (प्रत्येकी 1 गुण)

1. आवडती ×

2. आत ×

3. नवे ×

4. महाल ×

5. प्रकाश ×

6. आधी ×

7. इवली ×

8. सकल ×

9. बांधणे ×

10. देव×

5.कवितेतील प्रासयुक्त शब्द लिहा. (सुलभ).   (प्रत्येकी 1गुण)

1. पणती -

2. नवे–

3. बिजली-

4. मिळो -

5. अडे -

6. कुणी -

7. ज्योती -

8. मला -

9. बाहेर -

10. देतो -

6.जोड्या जुळवा. (सुलभ)   (प्रत्येकी 1 गुण)

अ.	ब
1.घराघरातून	सकलाला
2.प्रकाशद्यावा	जग उजळो

3.देह जळोमाझ्यात	घडे
4.मीचतयातील	मिणमिणती
5.नवाबदलपरी	ज्योती

अ	ब
1.दिवटी	कंदील
2.समई	घरेमंदिरे
3.काचेचा	महालवरात
4.बत्ती	देवापुढे
5.बिजली	पणती
6.इवली	शेतकरी

7.एका वाक्यात उत्तरे लिहा.(प्रत्येकी 1 गुण)

1. दिवटी कोणाची आवडती होती? (सुलभ)

2. पणती कशी आहे?(सुलभ)

3.समई कोठे लावतात? (सुलभ)

4. या कवितेत काळासा धूर कोण सोडते? (सुलभ)

5. या कवितेत काचेचा महाल कोणास म्हटले आहे? (कठीण)

6. वरात कोणा वाचूनअ डते? (सुलभ)

7. झगमगाठ कोणाचा पडतो?(सुलभ)

8. आता ज्योत काय झाली आहे? (साधारण)

9. घरे मंदिरे कोणामुळे लखलखतात?(सुलभ)

10. ज्योत देवाला काय म्हणत आहे? (साधारण)

8.दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.   (प्रत्येकी 3 गुण)

1.दिव्याची ज्योत कोणता संदेश देते?(कठीण)

2 .ज्योतीला काचेचा महाल का बांधण्यात आला? (कठीण)

3. ज्योत सर्वांना प्रकाश देते. हा ज्योतीचा गुण आहे. दुसऱ्याचा गुण घ्यावा, असे याच पुस्तकात कोणत्या कवितेत सांगितले आहे? त्या ओळी पहा व पुन्हा लिहा? (कठीण)

4. ज्योत कवितेत आलेल्या प्रकाश दिपांचे टप्प्याटप्प्याने वर्णन करा? (साधारण)

5. प्रकाशदीपा मधील ज्योत कोणती साधने वापरल्यामुळे पेटते? (साधारण)

6.या कवितेतील वर्णन केलेल्या प्रकाश दीपांची चित्रे काढा.(कठीण)

7. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा. (साधारण)

एकच .... काम.......

. ... द्यावा सकलाला

.... मज....... मिळो

देह................. उजळो

8. तुमच्या घरी दिव्याची पूजा कोणत्या सणाला करतात?

9. योजनाकार्य (प्रत्येकी 4 गुण)

1.माती पासून पणती तयार करा. (कठीण)

2.. कागदापासून कंदील तयार करा. (कठीण)

पाठ -21.

श्री बसवेश्वर

- निल नकाशा

- उद्दिष्टानुसार गुणांची विभागणी

अध्ययन उद्दिष्टे	शेकडा	गुण	प्रश्न संख्या
ज्ञान	27	8	8
आकलन	60	18	17
अभिव्यक्ती	7	2	2
प्रशंसा	6	2	1
एकूण	100	30	28

- काठीण्यता पातळीनुसार गुण विभागणी

प्रश्न प्रकार	शेकडा	अंक	प्रश्न संख्या
सुलभ	47	14	14
साधारण	40	12	12
कठीण	13	4	2
एकूण	100	30	28

- अध्ययन निष्पत्ती

- बसवेश्वरांच्या योगदानाविषयी जाणून घेतो.
- बसवेश्वरांचा प्रामाणिकपणा व विचाराप्रमाणे आचरण करतो
- विविध व्याकरण चिन्हांचा उपयोग करतो.

अ . भरा शब्द योग्य जागी रिकाम्या   5 x । = 5)

(बलदेव , अनुभवमंटप , बसववचन, कुडलसंगम, संगमेश्वर)

।). कृष्णा व मलप्रभा नद्यांच्या संगमावर .... हे सुंदर मंदिर आहे.

2). बिज्जल राजाच्या दरबारात .... हा मुख्यमंत्री होता .

3). अल्लम प्रभुदेवांच्या आशीर्वादाने त्यांनी .... चर्चा मंदिर बांधले.

4). बसवेश्वरांच्या काव्यांना ....असे म्हणतात.

5). बसवेश्वरांनी .... येथे समाधी घेतली.

आ (साधरण) .लिहा शब्द समानार्थी (5 x । = 5)

।. उपासना –

2 . सात्विक -

3. अहोरात्र -

4. आई -

5. कीर्ती -

इ (सुलभ) .लिहा शब्द विरुद्धार्थी (5 x । = 5)

1. प्रामाणिक x

2. सामर्थ्य x

3. गद्यरूप x

4. धर्म x

5. सुंदर x

ई .जुळवा जोड्या (5 x । = 5) (साधरण) .

1. मंदिर	1. बसवचन
2.मुख्यमंत्री	2. वीरशैव
3. काव्य	3. संगमेश्वर
4 . धर्म	4. युगप्रवर्तक
5. बसवेश्वर	5. बलदेव

उ) योग्य पर्याय निवडा. 6 x । = 6

1 . बसवेश्वर यांचा जन्म कोठे झाला ?

अ)संगमेश्वर ब) बेळगावी क) बागेवाडी ड) खानापूर

2 . चर्चा मंदिर मध्ये चर्चेत भाग घेणाऱ्या प्रमुखांना काय म्हणतात ?

अ) राजा ब) प्रजा क) युगप्रवर्तक ड) शिवशरण

3 . बसवेश्वरांचा कोणाशी विवाह झाला ?

अ) मलप्रभा ब) गंगाअंबिका क)मादलांबिका ड) कामाक्षी

4 . बसवेश्वरांच्या आईचे नाव काय होते ?

अ) कलकांबिका ब) गंगामिका क)मादलांबिका ड) मीनाक्षी

5 . लोकांनी त्यांना काय म्हणून गौरविले ?

अ)समाजसेवक ब)युगप्रवर्तक क)राजाधिराज ड)शिवशरण

6 . बलदेवाच्या मृत्यूनंतर बिज्जलाने मुख्यमंत्रीपदी कोणाची नेमणूक केली ?

अ)समाजसेवक ब)युगप्रवर्तक क)राजाधिराज ड)शिवशरण

ऊ) खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा. 2 x 2 = 4

।. बसवेश्वरानी आपला विद्याभ्यास कुठे केला ?

2 . बसवेश्वरांच्या मते खरा धर्म कसा असावा ?

ए) पुढे दिलेल्या शब्दांचा योग्य क्रम जुळवून अर्थपूर्ण शब्द तयार करा. (सुलभ) 5 x l = 5

1 . वे ब र स श्व ---------------

2 . क ण ल्या लो क -------------

3 . मं ख्य त्री मु --------------

4 . ग र्त व यु प्र क ----------------

5 . मा बु न ध्दि - ----------------

ऐ) वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर. (साधारण) 2 x 1= 2

1 . बुद्धिमान असणे :

2 . विद्याभ्यास करणे :

पाठ - 22

बोधाचा स्पर्श

- अध्ययन निष्पत्ती :

1) दिलेला पाठ्यांश समजून घेवून त्याचा दैनंदिन जीवनातील घटनांशी संबंध लावतात.त्यावर आपले अभिप्राय व्यक्त करतात.

2) आपल्या आजूबाजूच्या घडणाऱ्या विविध घटनांच्या पैलूकडे लक्ष देतात आणि त्याला लेखी / तोंडी प्रतिसाद देतात.

- नील नकाशा

उद्दिष्टानुसार गुणांची विभागणी

अध्ययन उद्दिष्टे	शेकडा	गुण	प्रश्न संख्या
ज्ञान	33	8	8
आकलन	38	12	9
अभिव्यक्ती	25	14	6
प्रशंसा	4	3	1
एकूण	100%	37	24

काठीण्यता पातळीनुसार गुण विभागणी

प्रश्न प्रकार	शेकडा	अंक	प्रश्न संख्या
सुलभ	58	14	14
साधारण	29	14	7
कठीण	13	9	3
एकूण	100%	37	24

I.योग्य उत्तर निवडून रिकाम्या जागा भरा.

1) .... मार्ग संकटाचा असतो. (सुलभ)

अ) अती ज्ञान आ) अती भूषणे इ) अती कोप ई) अती नम्रता

2) अती थाट .... वेश होतो. (सुलभ)

अ) वैद्याचा आ) शिक्षकाचा इ) नटाचा

ई) भटाचा

3) मानवाच्या जीवनामध्ये सर्व काही.......................... असावे. (सुलभ)

अ) प्रमाणात आ) जास्त इ) प्रमाणाबाहेर

ई) कमी

4) .... हा भिकेचा पाया आहे असे कवी म्हणतात. (सुलभ)

अ) अती काम आ) अती कोप इ) अती वाचन

ई) अती खेळ

5) भय निर्माण होण्याचे ....हे कारण आहे. (सुलभ)

अ) अती नम्रता आ) अती ज्ञान इ) अती कष्ट

ई) अती वाचन

II.अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

6.घोकणे - (साधारण)

7.कोपणे -(साधारण)

8.बोध- (साधारण)

9. भूषणे -(साधारण)

III.जोड्या जुळवा.

10. अभंगवाणी कबीर (सुलभ)

11. वचनरामदास (सुलभ)

12. ओवी बसवेश्वर (सुलभ)

13. मनाचे श्लोक तुकाराम (सुलभ)

14. दोहाज्ञानेश्वर (सुलभ)

IV. कवितेच्या ओळी पूर्ण करा. (साधारण)

15. अती कोपता कार्य ....

....

अती काम...

......................................काही असावे

V.एका वाक्यात उत्तरे लिहा.

16. शीण कशाने येतो?(सुलभ)

17. अतिशय संतापले तर काय होऊ शकेल?(सुलभ)

18. आपण कसे राहावे असे कवींना वाटते?(सुलभ)

19. त्रास कशामुळे होतो? (सुलभ)

VI.खालील ओळींचा अर्थ तुमच्या शब्दात लिहा. (कठीण)

20. अतीभूषणे मार्ग तो संकटाचा

अती थाट तो वेश होतो नटाचा

रहावे असे की न कोणी हसावे

प्रमाणामध्ये सर्व काही असावे.

VII.खालील प्रश्नांची तीन-चार वाक्यात उत्तरे लिहा.

21. कधी गद्य तर कधी पद्य वाचत जावे असे कवीला का वाटते? (साधारण)

22. कोणत्या गोष्टी अति करणे हे वाईट असे कवीला सांगायचे आहे?(साधारण)

VIII. विचार करा आणि तुमच्या शब्दात स्पष्टीकरण लिहा.

23. अती दागिने संकटाला कारण बनतात. (कठीण)

24. राग आला असताना कोणतेही काम करणे नुकसान देते.(कठीण)

पाठ-1

नव्यायुगाचेगाणे

❖ उत्तरपत्रिका

प्रश्न 1 ला योग्य पर्याय निवडा (सोपे).

1). (2) नव्यायुगाचे

2). (3) तारे

3). (4) अज्ञानाचा

4). (4) मानवतेचा दीप

5). (1) एक दिलाने

प्रश्न 2.भरा शब्द योग्य जागी रिकाम्या रा (सोपे)

6). श्रीमती शुभदा दादर

7).ध्येय मंदिरी

8). तारे

प्रश्न 3 रा जोड्या जुळवा . (सोपे)

अ		ब
9). अंतरी	=	मनात
10).तिमीर	=	अंधार
11). सारणे	=	बाजूस सारणे

12).नित्य = सतत

13). एकत्व = एकी समानता

प्रश्न 4 था समान अर्थी शब्द लिहा. (सोपे)

14). मनात

15). अंधार

16). सतत

प्रश्न 5 . *उत्तरे वाक्यात एका*

17). विज्ञानाच्या नभोमंडळी आपणास तारे होण्यास सांगितले आहे.

18).अज्ञानाचा तिमिर सारून तेजोमय सूर्य उगवला आहे.

19).अनेकतेतून आपणास एकत्वाचे गाणे गाण्यास सांगितले आहे.

20).ध्येय गाठण्यासाठी हातामध्ये हात गुंफून, देशहिताचा मंत्र जपून, हासत खेळत पुढे जाण्यास सांगितले आहे.

21).भारतभूमीची माती पवित्र आहे आणि ती स्वर्गाहुनही प्रिय आहे.

22).या धरणीचे रक्षण करण्यासाठी प्राण पणाला लावायचे आहेत.

प्रश्न . 6 वा

23). या ओळीतून कवयित्री सांगू ईच्छीते की – जीवनातील उध्दीष्टे गांठतांना किंवा ध्येयाकडे वाटचाल करतांना ती आनंदाने आणि उत्साहाने करावी, कोनतीही अडचन किंवा आव्हान असले तरी हसत खॆळत सामोरे जावे आणि नेहमी पूढे पूढे जात रहावे.

24). या कवितेत कवीने एकी, समानता, देशाभिमान, विज्ञाननिष्ठा, मानवतेची भावना आणि देशाचे रक्षण या गोष्टींवर भर दिला आहे.

प्रश्न 7 करा पूर्ण ओळी कवितेच्या खालील वा

25) हातामध्ये हात गुंफूनी देश हिताचा मंत्र जपोनी.

हासत खेळत ध्येय मंदिरी पुढे पुढे रे जाऊ.॥

भारतभूची पवित्र्य माती प्रिय आम्हाला स्वर्गाहूनही

या धरणीचे रक्षण करण्याप्राण पणाला लावू.

पाठ – 2

तीनमूर्ती

प्रश्न 1: खालील शब्दांचे मोठ्याने वाचन करा/श्रुत लेखन करा.

1. कष्ट
2. स्वतः
3. व्यक्ती
4. भोक्ता
5. नमस्कार
6. छिन्नीच्या
7. शाब्बास
8. वैशिष्ट्य
9. सन्मान
10. धन्यवाद
11. स्वभाव
12. रत्नहार
13. सर्वश्रेष्ठ
14. प्रश्नातील
15. महत्त्वाची
16. दशसहस्त्र

17. मूर्तिकाराचे

18. मुक्तकंठाने

19. प्रत्यक्ष

प्रश्न 2 : जोड्या जुळवा

6) राजा कलेचा	भोक्ता
7) मूर्तिकार	हुशार
8) पहिलीमूर्ती	एक शतक मोहरा
9) दुसरीमूर्ती	एक सहस्त्र मोहरा
10) तिसरीमूर्ती	दशसहस्त्र मोहरा

प्रश्न 3: समानार्थी शब्द लिहा

1. राजा–सम्राट ,नृप
2. सुंदर - मनोहर
3. परीक्षा–चाचणी,कसोटी
4. कौतुक - प्रशंसा
5. किंमत - मूल्य
6. खूप–प्रचंड,जास्त
7. दगड–खडक,पाषाण
8. डोके–शिर

9. कान - कर्ण

10. तोंड - मुख

प्रश्न 4: विरुद्धार्थी शब्द लिहा.

- मृदू x कठोर
- हजर x गैरहजर
- शूर x भित्रा
- कमी x जास्त
- गुण x दोष
- हुशार x ढ
- प्रशंसा x निंदा
- खुश x नाखूष
- स्वार्थी x निस्वार्थी
- सोपे x अवघड
- सुंदर x कुरूप
- खरे x खोटे
- ज्ञान x अज्ञान
- सन्मान x अवमान

प्रश्न 5 : अनेक वचनी रूप लिहा

1. राजा – राजे
2. मूर्ती – मुर्त्या
3. मोहोर- मोहरा

4. शंका – शंका

प्रश्न 6: वाक्य प्रचारांचा अर्थ आणि उपयोग

1. मुक्त कंठाने कौतुक करणे – मनपूर्वक प्रशंसा करणे
   - त्याने माझ्या कामाचे मुक्त कंठाने कौतुक केले.
2. खोचकपणे बोलणे – थेट आणि स्पष्ट बोलणे
   - काका त्याच्याशी थोडे खोचकपणे बोलले.
3. निरसन करणे –शंकेचे समाधान करणे
   - शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शंकेचे निरसन केले
4. प्रत्यक्ष भेटघे णे – थेट भेटणे
   - मी आज राजाशी प्रत्यक्ष भेट घेतली.
5. स्पष्टीकरण करणे – स्पष्टपणे समजावून सांगणे
   - शिक्षकाने प्रश्नाचे स्पष्टीकरण केले.

प्रश्न 7: योग्य विराम चिन्हे देऊन वाक्ये लिहा

6) मूर्तिकार: महाराज,आपण इथवर यायचे कष्ट कशाला घेतलेत?

7) एवढे कठीण काम तुला सोपे कसे वाटते?

8) अरेवा!छान.अगदी हुबेहूब एक सारख्याच मूर्ती आहेत.

9) व्वा!खरंच तू उत्तम मूर्तिकार आहेस.

10) मधुने दहा,वीस,पन्नास,शंभर,दोनशे व पाचशेच्या नोटा बाहेर काढल्या.

प्रश्न - 8 खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांची जात ओळखून लिहा.

5) राजा व प्रधान मूर्तिकारास भेटण्यास गेले.

उत्तर-नाम

6) मूर्तिकाराने सुंदर मूर्ती तयार केली होती.

उत्तर-विशेषण

7) वाह !खरंच तू उत्तम मूर्तिकार आहेस.

उत्तर-केवलप्रयोगीअव्यय

8) मी फक्त त्या दगडातील मला नको असलेला भाग काढून टाकतो.

उत्तर-सर्वनाम

प्रश्न 9 : कोणी कोणास म्हटले आहे ते लिहा.

4) “बोला महाराज, काय सेवा करू आपली ?”

उत्तर-मूर्तिकाराने राजास म्हटले आहे.

5) “एवढे कठीण काम तुला सोपे कसे वाटते ?”

उत्तर-राजाने मूर्तिकारास म्हटले आहे.

6) “महाराज, एकाच प्रकारच्या तीन मूर्ती केलेल्या आहेत.”

उत्तर-प्रधानाने राजास म्हटले आहे.

प्रश्न 10 : योग्य पर्याय निवडा

6) दरबारी कोणाचे कौतुक करत होते ?

क.मूर्तिकाराचे

7) राजा कोणाला भेटायला गेला ?

अ. मूर्तिकाराला

8) मूर्तिकाराने कशाच्या मूर्ती तयार केल्या होत्या ?

ड. दगडाच्या

9) मूर्तिकाराने एकाच प्रकारच्या किती मूर्ती तयार केल्या होत्या ?

क. तीन

10) सर्वश्रेष्ठ मूर्ती कोणती होती ?

क. तिसरी

प्रश्न 11: रिकामी जागा भरा

1. मुक्तकंठाने
2. भोक्ता
3. शंका
4. सुंदर
5. तीन
6. स्वभाव
7. शंभर
8. एक सहस्त्र मोहरा
9. उत्तम
10. रत्नहार

प्रश्न 12 : एका वाक्यात उत्तरे

1. कलेच्या रूपाने समाजाची सेवा मूर्तिकार करतो.
2. राजा मूर्तिकराकडे काही शंका घेऊन गेला होता.
3. मूर्तिकार सुंदर आकर्षक आणि उठून दिसणाऱ्या मूर्ती तयार करत होता.
4. पहिल्या मूर्तीची किंमत शंभर मोहरा होती.
5. दुसऱ्या मूर्तीची किंमत एक सहस्त्र मोहरा होती.
6. तिसऱ्या मूर्तीची किंमत दशसहस्त्र मोहरा होती.

7. दुसऱ्या मूर्तीच्या कानातून घातलेला दोरा तिच्या तोंडातून बाहेर पडत होता म्हणजेच अशी व्यक्ती ऐकलेलं पटदिशी दुसऱ्याला बोलून मोकळी होते हे दुसऱ्यामूर्तीचे वैशिष्ट्य होते.
8. तिसरी मूर्ती सर्वश्रेष्ठ होती.
9. मूर्तीतील फरक मानवाच्या स्वभावाला लागू पडतात.
10. राजाने आपल्या गळयातील रत्न हार मूर्तिकाराला देऊन त्याचा सन्मान केला.

प्रश्न 13: तीन-चार वाक्यात उत्तरे

7. मूर्ती बनविणे हे कठीण काम असते कारण दगड खूप कणखर व टणक असतो पण दगडावर एकजरी छिन्नीचा घाव जादाचा पडला की दगड फुटू शकतो.
8. मूर्तिकार मूर्ती बनविताना फक्त एकच गोष्ट लक्षात ठेवतो ती म्हणजे त्या दगडातील नको असलेला भाग तेवढाच तो छिन्नीच्या सहाय्याने काढून टाकतो मग मूर्ती आपोआप तयार होते
9. मूर्तिकाराने तयार केलेल्या पहिल्या मूर्तीची किंमत 100 मोहरा होती दुसऱ्या मूर्तीची किंमत एकसहस्त्र मोहरा होती आणि तिसऱ्या मूर्तीची किंमत दशसहस्त्र मोहरा होती.
10. एका कानाने ऐकलेले लगेच दुसऱ्या कानाने सोडून देणे म्हणजेच नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे अशा प्रकारचा गुण पहिल्या मूर्तीमध्ये दडलेला होता.

11. दुसऱ्या मूर्तीच्या कानातून घातलेला दोरा तिच्या तोंडातून बाहेर पडत होता म्हणजेच अशी व्यक्ती ऐकलेलं पटदिशी दुसऱ्याला बोलून मोकळी होते हे दुसऱ्या मूर्तीचे वैशिष्ट्य होते.

12. तिसऱ्या मूर्तीच्या कानातून घातलेला दोरा सरळ जाऊन मूर्तीच्या डोक्यात गोळा होतो तो कुठून ही बाहेर पडत नाही म्हणजेच अशाप्रकारची व्यक्ती ऐकून मिळविलेले ज्ञान आपल्या मेंदूत साठवून ठेवते जेव्हा गरज पडेल तेव्हाच त्या ज्ञानाचा वापर करते म्हणून तिसरी मूर्ती सर्वश्रेष्ठ होती.

प्रश्न 14 : थोडक्यात उत्तरे

4. मूर्तिकारामध्ये असलेले कौशल्य, सूक्ष्मता, कलाप्रेम, एकाग्रता, नम्रता, हुशारी, सचोटी, प्रामाणिकपणा इत्यादी गुण मला खूप आवडले.
5. वरील कथेतील मूर्तींपैकी आपण तिसऱ्यामूर्ती सारखे वागले पाहिजे आपण जे काही ज्ञान मिळवितो ते साठवून ठेवले पाहिजे व जेव्हा गरज पडेल तेव्हाच त्या ज्ञानाचा वापर केला पाहिजे उगाच कोणाचेही ऐकून कांही ही बोलणे किंवा मिळविलेले ज्ञान लगेच सोडून देणे असे वागल्यास आपली किंमत कमी होते.

6. 'मी पाहिलेली सुंदर मूर्ती'

आपण अनेक सुंदर मूर्ती पहात असतो. अशा पाहिलेल्या मूर्तींपैकी मला आमच्या गल्लीतील गणेशोत्सव मंडळाची बाप्पाची मूर्ती खूप खूप आवडली. कारण ही मूर्ती भव्य होती पण मूर्तीवरील कलाकुसर अतिशय नाजूक व आकर्षक होती. बाप्पांचे डोळे अगदी जिवंत वाटत होते. बाप्पांचे वस्त्र अगदी खऱ्या वस्त्रा सारखे वाटत होते. मूर्तीमध्ये जिवंतपणा भरलेला होता. बाप्पांना डोळे भरून बघतच राहावे असे वाटत होते.

7. किंवा 'मी पाहिलेला सुंदर पुतळा'

आपल्या देशात ठीक ठिकाणीअनेक पुतळे असतात.यापैकी मी पाहिलेला आणि मला आवडलेला पुतळा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा येळ्ळूर गडावरील पुतळा होय.हा पुतळा अतिशय भव्यदिव्य आहे.महाराज सिंहासनावर आरुढ झालेले आहेत.या पुतळ्याकडे पाहिल्यावर एक मराठा म्हणून आपला ऊर अभिमानाने भरून येतो व आपल्या राजासमोर नतमस्तक व्हावेसे वाटते.

पाठ – 3

शब्दांच्या जाती

❖ उत्तर पत्रिका

I. 1. क) प्रार्थनेने

2. ब) शिस्तीने

3. अ) उद्गारवाचक चिन्ह

4. ड) आठ

II.

1. आमच्या मनात काय आहे हे सांगण्यासाठी आपण बोलतो.

2. बोलणे शब्दापासून बनते.

3. एक किंवा अनेक अक्षरांच्या समूहापासून काहीतरी अर्थबोध होतो त्याला शब्द म्हणतात.

4. मराठी भाषेत एकूण 48 वर्ण आहेत.

5. शिक्षकांनी फळयावर – मी, तू, आण, बघ, बस, पहाट हे शब्द लिहिले होते.

III.

1. फुलपाखरे

2. विशेषण

3. क्रियापद

4. खानापूर

IV.

1. गुरु, अध्यापक

2. सकाळ

3. बुद्धिवान

4. योग्य

5. पुष्कळ, जास्त

V.

1. बेशिस्त

2. बेसूर

3. अनर्थ

4. आता

5. उत्तर

VI.

1. द्या (विद्यार्थी)

2. न (नमस्कार)

3. गी (राष्ट्रगीत)

4. ता (कविता)

VII.

1. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले

2. वर्गात शिक्षक येतात सर्व मुले गप्प बसली.

3. आईने मला काम सांगितले.

4. माझा परीक्षेत पहिला नंबर आल्यामुळे शिक्षकांनी मला शाब्बासकी दिली.

5. राम वर्गात हुशार विद्यार्थी आहे.

VIII.

1. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय, केवलप्रयोगी अव्यय.

2.



पाठ - 4

कडुनिंब

❖ उत्तरपत्रिका

प्रश्न 1.

1.निंबलिंबडा/

2.सदाहरीत

3.फूट 25 ते 20

4. उदि रंगाची

5. गोलाकार

6.चांदणी

7. फिकट पिवळा

8.कडुनिंबाचे तेल

9.दंतमंजनासाठी

10. जड

प्रश्न 2. रिकाम्या जागा भरा

1. सदाहरित वृक्षाच्या

2. निंबोण्या

3.हिरव्या रंगाच्या

4.त्वचेच्या रोगावर

5.होड्या तयार करण्यासाठी

6.औषधोपयोगी

7.नागमोडी

8.चांदणीच्या आकाराची

9. सुवासामुळे

10. गळून

प्रश्न .3 जोड्या जुळवा

अ.	ब
.साल कडुनिंबाची 1	उदी रंगाची
2.कडुनिंबाची काढी .	दात घासण्यासाठी
.झाड कडुनिंबाचे 3	साधारण असते फुटाचे 30 ते 20
4.कडुनिंबाची फुले .	चांदण्या आकाराची असतात
.पाने कडुनिंबाची 5	हिरवी व रसरशीत असतात
.कडुनिंब 6	सदाहरित वृक्ष
.फुल कडुनिंबाचे 7	फिकट पिवळा रंग
.नाव दुसरे बाचेकडुनिं 8	लिंबडा
9 कडुनिंबाच्या बिया .	तेल काढण्यासाठी वापरतात
.लाकुड कडूनिंबाचे 10	जड असते

4.एकतेदोन वाक्यात उत्तरे

1.कडुनिंबाचे झाड कोणत्याही वातावरणात वाढु शकते बहुदा कोरड्या वातावरणात चांगले वाढते.

2.सदाहरित म्हणजे जे सदैव हिरवेअसते. सदाहरित वृक्ष म्हणजे जे झाड कायम हिरवेगार असते ते सदाहरीत वृक्ष होय.

3.कडुनिंबाची झाडे कार्बन डायऑक्साईड हा वायू शोषून घेतात.

4.कडुनिंबाची झाडे ऑक्सिजन वायू बाहेर सोडतात.

5.कडुनिंबाच्या फुलाचा सुवास गोड असतो त्यामुळे कीटक या फुलांकडे आकर्षिले जातात.

6.कडुनिंबाची फुले अत्यंत छोटी असून ती चांदणीच्या आकाराची असतात.

7.कडुनिंबाच्या बियापासून कडुनिंबाचे तेल बनवतात.

8.कडुनिंबाच्या लाकडाचा उपयोग होड्या तयार करण्यासाठी करतात.

9.कडुनिंबाच्या फुलांचा आकार चांदणीच्या आकाराचा असतो.

